
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी · गुरुवार दि.६ नोव्हेंबर २०२५ · 9422660077 · आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ · वर्ष ३ रे · अंक ७६ · पाने ४ · किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi · Thrusday 6 Nov 2025 · 9422660077 · RNI-MAHMAR / 2023 / 87555 · Year - 3rd · Issue 76 · Pages 4 · Rate 4 Rs

## काही लोकांची आपल्यावर वाईट नजर

**मुंबई**–एकनाथ शिंदे यांनीही यावेळी शिवसेनेतील उठावाची माहिती देत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, शिवसेनेत उठाव करून आम्ही गुवाहाटीला पोहोचलो. तेथून परत आलो. यातील वरची कथा सगळ्यांना माहिती आहे. पण या घटनाक्रमावर एखाद्याला पुस्तक लिहायचे असेल तर खरी कथा मलाच माहिती आहे. त्यासाठी माझ्याशीच बोलावे लागेल.सध्या काहीजण राजकारणात दिशाहीन झाले आहेत. काही लोकांची आपल्यावर वाईट नजर आहे. पण बुरी नजर वाले तेरा मुंह काला, विधानसभा में धो डाला, अब पालिका इलेक्शन में पडेला फिर से पाला. लेकिन महायुती के गेले में ही पडेगी विजय की माला, असा टोला शिंदे यांनी यावेळी विरोधकांना विशेषतः उद्धव ठाकरे यांना हाणला.

# हे सरकार चोर; त्यांच्याविरुद्ध हर हर महादेव आरोळी ठोका

## उद्धव ठाकरे धाराशिवमध्ये कडाडले




**धाराशिव (वृत्तसंस्था)–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज धाराशिवच्या भूम तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. सगळे शेतकरी आहेत ना रे? नाही म्हणजे आता काय झालंय, चोर ते चोर, वरुन चोराच्या उलट्या बोंबा, असं सरकारचं काम आहे. हे हेही बोलायला कमी पडणार नाहीत की, उद्धव ठाकरेंनी मुंबईतून माणसं आणली आणि त्यांना धोतर-टोपी घालून बसवलं. हे सरकार चोर आहे, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.मी मुद्दामून मराठवाड्यात फिरतोय. तुमच्या लक्षात आलं असेल, कुठेही मोठी जाहीरसभा घेत नाहीय. मी थेट तुमच्यामध्ये येऊन बोलतोय. कारण मी राजकारण करायला आलेलो नाही तर तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी आलेलो आहे. आता अनिल दादा बोलत होता. म्हणजे काय बोलायचं? हा हंबरडा फोडून नाही चालायचं. त्यांच्या विरुद्ध हर हर महादेव म्हणून मोठी आरोळी ठोकली पाहिजे. हर हर महादवे अन् या मैदानामध्ये. किती फसवणूक करायची?, असा सवाल ठाकरेंनी केला.**

मधल्या काळामध्ये आपत्तीमध्ये मी आलो होतो. त्यानंतर मी एक मोर्चाही काढला. आपले मुख्यमंत्री काय म्हणाले, इतिहासातील सर्वात मोठं पॅकेज. तेव्हाच मी बोललो होतो की, ही इतिहासातील सर्वात मोठी थाप आहे. आता मी तेच विचारायला आलो आहे. नेमकं काय-काय पडलं आहे? पॅकेज जाहीर झाले आहेत, ज्यांची जमीन खरडून गेली आहे त्यांना किती रुपये मिळाली आहेत. एवढं बेमालूपणाने बोलायचं. पॅकेज जाहीर केलं. पण शेतकऱ्याच्या बँक खात्यात पैसे का आले नाहीत? त्या पॅकेजला सुद्धा खेकड्याने भोकं पाडले का? जसं धरणाला खेकड्याने पाडलं होतं, असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.या अन्नदात्याला तुम्ही किडलेलं धान्य देत आहात, या सरकारला लाज वाटत नाही, या बेशरम राज्यकर्त्यांना लाज वाटत नाही. तांदूळ बघितले. आपल्या मुलाबाळांना आपण हे खायला देणार? तुम्ही सोनं पिकवायचं आणि खायला माती द्यायची. हा कुठला न्याय आहे? सरकार दगाबाज आहे. दगाबाजासोबत दगाबाजीच केली पाहिजे. दगाबाजी केल्याशिवाय चालणार नाही. मी आज बोलायला आलेलो नाही तर तुम्हाला बोलतं करायला आलेलो आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.निवडणुका आल्या म्हणून तुम्ही आपत्ती मदतीला स्थगिती देताय. मग आता सुद्धा ढगाळ वातावरण आहे. निवडणुका आल्या म्हणून तुम्ही पावसाला स्थगिती देताय? आचारसंहिता लागल्या हे पावसा पडू नको असं म्हणतो का? नाही ना? शेतकऱ्याचं सगळं उद्ध्वस्त झालं आहे. पीक विम्याचे पैसे किती जणांना मिळाले आहेत. काही लोकांना मिळाली आहेत. किती मिळाले आहेत? दोन रुपये, सहा रुपये मिळाले आहेत. पीक विम्यासाठी किती रुपये भरावे लागतात? एकरी १२०० रुपये. पिकानुसार वेगळा दर. नुकसान झाल्यानंतर तुम्हाला तीन रुपये मिळतात?, असे देखील सवाल त्यांनी केले.ज्या शेतकऱ्यांची फसवणूक होईल त्यांच्याकडून कार्यकर्त्यांनी पावत्या घ्या. विमा कंपन्यांना सांगतोय, शेतकऱ्यांची पूर्ण भरपाई द्या. नाहीतर हे सर्व शेतकरी तुमच्या कार्यालयात धडकल्याशिवाय राहणार नाहीत. आनंदाचा शिधा बंद. शिवभोजन थाळी बंद. मुख्यमंत्री बोलले होते, दिवाळी आधी मदत करणार. पण आता मुख्यमंत्री कुठे? तर बिहारमध्ये. मुख्यमंत्री तिथल्या जाहीर सभेत सांगतात की, पंतप्रधानांचं सगळ्या राज्यांवरती प्रेम आहे. पण आतली गोष्ट म्हणजे पंतप्रधान मोदींचं बिहारवर जास्त प्रेम आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मिळालेच पाहिजेत. आता कर्जमाफी जूनमध्ये काय? जूनपर्यंतचे हफ्ते भरायचे की नाहीत? आम्हाला हमीभाव द्या. आम्हाला तुमच्या उपकाराची गरज नाही, असं उद्धव ठाकरे यांनी ठासून सांगितलं.

## मयंक गांधींचे शेतकऱ्यांना पत्र; ७ नोव्हेंबर ला सिरसाळा येथे शेतकरी संवाद मेळावा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या बदलत्या परिस्थितीला दिशा देण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना पत्र पाठवले असून, आता वेदनांची साखळी तोडून समृद्धीचा नवा मार्ग घडवायची वेळ आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.



शेतकऱ्यांनी पारंपरिक कापूस, सोयाबीन शेतीऐवजी केळी, पपई आणि रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहन गांधी यांनी केले आहे. या शेतीतून दरवर्षी २२ ते २३ लाखांचे उत्पन्न मिळू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. या उद्देशाने ग्लोबल विकास ट्रस्ट आणि एका अग्रगण्य बँकेदरम्यान करार झाला असून, शेतकऱ्यांना एकूण २०० कोटींचे कर्ज देण्यात येणार आहे. त्यापैकी १०० कोटी केळी लागवडीसाठी व १०० कोटी रेशीम शेतीसाठी वितरित होणार आहेत.

या उपक्रमाची घोषणा ७ नोव्हेंबर रोजी परळी तालुक्यातील सिरसाळा येथे आयोजित भव्य शेतकरी संवाद मेळाव्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला भारताचे कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यात शेतकऱ्यांना माफक दरात रोपे, मोफत प्रशिक्षण, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून, कृषी विभाग आणि ट्रस्ट यांच्यात समन्वय करार करण्यात येणार आहे. मेळाव्यात १०० हून अधिक कृषी संलग्न स्टॉल उभारले जाणार असून, आयुष्मान भारत योजनेत नोंदणीसाठी प्रशासनाकडून सुविधा उपलब्ध राहील.ठिकाण: पोहनेर रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड दिनांक: ७ नोव्हेंबर २०२५ वेळ: सकाळी १०.३० वा.

## परळीतील टोकवाडी येथे कापूस गळीत हंगामाचा शुभारंभ शेतकऱ्याला मिळाला सर्वोच्च भाव ७३०१ प्रती क्विंटल

### मा.सूर्यभान नाना मुंडे यांच्या हस्ते परळी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीत हंगाम २०२५-२६ ला प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**


आज दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी शेतकरी कापूस प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., परळी वैजनाथ यांच्या जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरी, टोकवाडी येथे कापूस गळीत हंगाम २०२५-२६ चा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. या हंगामाच्या शुभारंभप्रसंगी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. सूर्यभान नाना मुंडे यांच्या हस्ते . शेतकरी म्हणून सतीश बनसोडे (रा. नागापूर) यांचा कापूस खरेदी करण्यात आला असून त्यांना तालुक्यातील सर्वोच्च भाव ७३०१ प्रती क्विंटल देण्यात आला.



या प्रसंगी जिनिंगचे संस्थापक अध्यक्ष व कापूस पणन महासंघाचे उपाध्यक्ष ड. विष्णुपंत सोळंके, जिनिंगचे उपाध्यक्ष ड. एन. जी. देशमुख, बाजार समितीचे मुख्य लेखापाल गोविंदभाऊ मुंडे, बाजार समितीचे संचालक ड. रणजीत सोळंके, तसेच तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकरी बालासाहेब गणपत सोळंके, नागापूर येथील जेष्ठ नागरिक मा. चंद्रभान सोळंके, माणिक आप्पा सोळंके (मुकादम व सावकार), ज्ञानोबा माऊली देशमुख, दिलीप दादा सोळंके, मा. चेअरमन बाबासाहेब सोळंके, जेष्ठ शेतकरी नेते कैलास सोळंके, सुंदरराव सोळंके, तसेच हमाल-मापाडी संघटनेचे अध्यक्ष अंगदराव मुंडे, मापाडी दिनकर मुंडे व जिनिंगचे व्यवस्थापक सुरज शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या शुभारंभ सोहळ्याचे प्रास्ताविक आणि शेतकऱ्यांचे तसेच मान्यवरांचे आभार सत्यजित सोळंके यांनी मानले.

## अनिल जगताप यांची कपिलधारवाडीतील भूस्खलनग्रस्तांच्या पुनर्वसनाची मागणी!

### अनिल जगताप यांचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना निवेदन



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील कपिलधारवाडी येथे अलीकडे झालेल्या भूस्खलनामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून परिसरातील जमिनीत भेगा पडल्यामुळे तेथील घरांना आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर काल दि. ५ नोव्हेंबर २०२५ मुक्तागिरी निवास, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी निवेदन सादर केले. या निवेदनात कपिलधारवाडी येथील भूस्खलनग्रस्त नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची मागणी करण्यात आली. अनिलदादांनी निवेदनासोबत भूस्खलनग्रस्त ठिकाणांचे प्रत्यक्ष फोटो आणि सविस्तर माहिती सादर करत, प्रभावित नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविणे, पुनर्वसनासाठी ठोस योजना तयार करणे आणि भविष्यात अशा आपत्तींपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी केली. या निवेदनावर प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी, कपिलधारवाडीतील लोकांची समस्या सोडवण्यासाठी शासन पातळीवर तातडीने ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शिवसेना संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब उपस्थित होते.

## बदामराव पंडित, बाळराजे पवार यांची एक तास बैठक; निवडणुकीचे ठरले!

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यानंतर पहिल्यांदाच युवा नेते बाळराजे पवार यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. या दोन्ही भाजप नेत्यांमध्ये तब्बल एक तास विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली असून, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत रणनीती ठरल्याचे समजते.

भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा राज्याचे मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या



भाजपा प्रवेशानंतर पहिल्यांदाच गेवराईत भाजपा युवा नेते बाळराजे पवार यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसह विविध विषयावर सुमारे एक तास सविस्तर चर्चा झाली. पुढील रणनीती कशी असावी हेही ठरल्याचे समजते. तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि न प निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी कडून इच्छुक असलेल्या पदाधिकाऱ्यांची एकत्रित व्यापक बैठक घेण्याचेही यावेळी ठरले आहे. या बैठकीनंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी युवानेते बाळराजे पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन स्वागत केले. याप्रसंगी बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, युवानेते यशराज पंडित, शिवाजीराव मोटे, माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, सरपंच कैलास माने, सरपंच मुकुंद बाबर, बबलू खराडे, भाऊसाहेब माखले, प्रकाश तळेकर, गणेश लाड आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## उदगीर व जळकोट शहरातील बसस्थानकाचे उर्वरीत प्रश्न तात्काळ सोडवा-प्रताप सरनाईक यांच्याकडे आ.संजय बनसोडे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उदगीर व जळकोट शहरात गेल्या वर्षभरापासून अत्याधुनिक बस स्थानकाचे काम सुरू असून यामध्ये राहिलेल्या सुविधा व उदगीर व जळकोट मतदार संघात ये - जा करणाऱ्या महामंडळाच्या एस.टी. बसेसची कमतरता, आदीसह राहिलेले उर्वरित प्रश्न तात्काळ सोडउन उदगीर व जळकोट मतदार संघातील प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी. अशी मागणी माजी मंत्री तथा उदगीर जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मंत्रालयात भेट घेऊन मागणी केली. आ. संजय बनसोडे यांच्या मागणीचा विचार करून मतदारसंघातील बस स्थानक व उर्वरित प्रश्न तात्काळ सोडविण्याचे आश्वासन परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले आहे.उदगीर मतदार संघ हा तीन राज्याच्या सीमेवर असल्याने येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. महामंडळाच्या उपलब्ध असणाऱ्या बसेस ह्या कमी पडत आहेत, तर काही बसेस नादुरुस्त व काही मोडकळीस आलेल्या असल्याने या भागातील प्रवाशांना प्रवास करताना अडचण निर्माण होत आहे. उदगीर व जळकोट शहरात बस स्थानकाचे काम सुरू असून त्या कामाचा आढावा घेऊन उर्वरित काही कामांना निधी उपलब्ध करून देवुन मतदार संघातील उदगीर व जळकोट येथे नविन बसेस उपलब्ध करुन द्याव्यात.

संपादकीय

# अखेर बिगुल वाजले

महाराष्ट्र राज्यात ज्याची राजकीय घटकांना कमालीची प्रतीक्षा होती, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे 'बिगुल' वाजले आहे. निवडणूक आयोगाकडून राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्याने राज्यभरात आता आचारसंहिता सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात, यासाठी स्थानिक पातळीवर अनेक राजकीय घटकांनी आपल्या घरातील देवही कदाचित पाण्यात ठेवले असावेत. २०२० साली देशात कोरोनाचे आगमन झाल्यानंतर राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. कधी न्यायालयीन प्रक्रियेमुळे तर कधी ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक निवडणुकांना सातत्याने विलंब होत गेला. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊन त्यांचे निकालही सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले. मतदारयाद्यांचा मुद्दा अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे निवडणुका लांबणीवर पडण्याची टांगती तलवार राजकीय घटकांवर व त्यांच्या पक्षांवर होती. आता निवडणूक आयोगाकडून नगर परिषदा व नगर पंचायतींचा निवडणूक कार्यक्रमच जाहीर केल्याने राजकीय कुरुक्षेत्रावर हालचालींना गती प्राप्त झाली आहे. या निवडणुका होताच महानगरपालिकांच्याही निवडणुकांचाही कार्यक्रम जाहीर होणार असल्याचे बोलले जात आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या राजकारणात महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. विधानसभा निवडणुकांच्या माध्यमातून राज्य व लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशावर सत्ता मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवरील नगर परिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, महानगरपालिका ताब्यात असणे आवश्यक असते. लोकशाहीतील सत्तेचा पाया म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नेहमीच पाहिले जाते. महाविकास आघाडी व महायुती महाराष्ट्राच्या राजकारणात कार्यरत असली तरी स्थानिक निवडणुकांना ते एकत्रितपणे सामोरे जाण्याची शक्यता कमीच आहे. त्या त्या भागातील स्थानिक राजकीय समीकरणे, पक्षाची ताकद, नेतेमंडळींचा प्रभाव, पदाधिकाऱ्यांचा जनसंपर्क यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. पक्ष संघटना चालविण्यासाठी, नावारूपाला आणण्यासाठी, पक्षाकडे जनाधार वळविण्यासाठी स्थानिक भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी खऱ्या अर्थाने परिश्रम करत असतात. आमदार, खासदारांचा तळागाळातील जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यांनाही स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांवर व पदाधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. आता निवडणुकांच्या तारखाच जाहीर झाल्याने वेळेचे गणित सांभाळत प्रत्येक पक्षाला व त्यांच्या नेतेमंडळींना तसेच पदाधिकाऱ्यांना राजकीय सारीपाटावर 'मिले सूर मेरा तुम्हारा' हे गाणे युती, महायुती, आघाडीमध्ये आळवावे लागणार आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाची राजकीय ताकद स्पष्ट होत असल्याने या निवडणुकांमध्ये सर्वांचीच प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. काही राजकीय पक्षांचा, नेतेमंडळींचा शहरी भागात, तर काहींचा ग्रामीण भागामध्ये प्रभाव अधिक असतो. काहींची पक्षबांधणी, नेतेमंडळींचा प्रभावही त्या त्या भागानुसार बदली होत असतो. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपंचायती व नगर परिषदांमध्ये प्रभावी ठरणाऱ्या पक्ष संघटनांना शहरी भागातील महापालिका निवडणुकांमध्ये फारसा प्रभाव पाडता येत नाही, त्यांना मर्यादा पडतात. नाण्याची दुसरी बाजू पडताळल्यास महापालिका निवडणुकांवर सत्ता मिळणाऱ्या पक्षांना ग्रामीण भागातील जनता फारशी स्वीकारत नसल्याचे अनेक निवडणुकांमध्ये पाहावयास मिळाले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागील निवडणुका व आताच्या निवडणुकांमध्ये कमालीचा फरक पाहावयास मिळणार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची व ठाकरेंच्या शिवसेनेची विभागणी झाली आहे. अजित पवारांच्या माध्यमातून राष्ट्रवादीत, तर एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून शिवसेनेत फूट पडली आहे. शरद पवार आणि उबाठा हे काँग्रेससोबत महाविकास आघाडीमध्ये विरोधकांच्या भूमिकेत, तर अजित पवार व एकनाथ शिंदे हे भाजपसोबत महायुतीमध्ये सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेत आहेत. एकेकाळचे हाडवैर विसरून ठाकरे बंधू काही महिन्यांपासून राजकीय सारीपाटावर गळ्यात गळे घालून एकमेकांचे गोडवे गावू लागल्याने काही प्रमाणात राजकीय समीकरणात उलथापालथ होण्याची शक्यता आहे. अर्थात शिवसेना उबाठा गट व मनसे एकत्र आली आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने जरी त्यास संमती दिली तरी मनसेशी जवळीक करायला काँग्रेस राजी होण्याची शक्यता कमीच आहे. परप्रांतीय मते भाजपने आपल्याकडे वळविली असली तरी काही टक्का आजही काँग्रेसकडे आहे. तो टक्का गमवावा लागू नये यासाठी काँग्रेस मनसेशी मिलाफ करून स्वत:च्या पायावर दगड मारून घेणार नाही. स्थानिक निवडणुकांमध्ये खऱ्या अर्थाने पक्षाची, कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची राजकीय ताकद समजत असल्याने जागावाटपामध्ये राजकीय वादावादी होतात.पक्षासाठी राबणाऱ्या, पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी घरादाराकडे दुर्लक्ष करून सतत जनसामान्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्थानिक निवडणुका लढविण्याची महत्त्वाकांक्षा पाहता युती, महायुती, आघाडीच्या नावाखाली संबंधित घटक तलवारी म्यानात घालण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. पक्षासाठी राबून पक्ष आपल्या कार्याचा, परिश्रमाचा विचार करणार नसेल तर पक्षाला नमस्कार करून नवीन पक्षामध्ये जाण्यासही अनेकजण मागे-पुढे पाहत नाहीत. आपल्यासाठी कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना गमविणे पुढील वाटचालीत हानिकारक ठरणार असल्याने वरिष्ठांनाही या सर्व कंगोऱ्यांचा गांभीर्याने राजकीय अभ्यास करावा लागतो. स्थानिक भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी हे पक्ष संघटनेसाठी व नेतेमंडळींसाठी अवघड जागेचे दुखणे असल्याने अनेकदा राज्यात व केंद्रात युती, महायुती, महाआघाडी असली तरी स्थानिक भागातील निर्णय अनेकदा स्थानिकांवर सोपविण्याची अगतिकता राज्य व केंद्र पातळीवरील नेतेमंडळींना स्वीकारावी लागत असते. नगर परिषदा व पंचायत समित्यांपाठोपाठ महापालिका निवडणुकांचेही बिगुल लवकरच वाजेल. मुंबई महापालिकेसाठी महाविकास आघाडी व महायुतीने गेल्या काही महिन्यांपासून मोर्चेबांधणी केलेली आहे. स्थानिक निवडणुका प्रत्येकासाठीच प्रतिष्ठेच्या असल्याने पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळींनाही या निवडणुकांमध्ये व्यस्त राहण्याची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

# भाविकांची चेंगराचेंगरी


तीन दिवसांपूर्वी आंध्र प्रदेशमधील श्रीकाकुलम जिल्ह्यात व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १२ भाविकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचे कारण अरुंद प्रवेशद्वार, बांधकाम चालू असलेला परिसर आणि प्रशासकीय हलगर्जीपणा असल्याचे मानले जात आहे. देव मंदिरात बाराही महिने असतो. तो कुठेही जात नाही. भक्त कधीही ये-जा करू शकतात, देव 'भक्तीचा भुकेला' असतो, अशी ही कल्पना आहे. तरीही यात्रा, एकादशी, तिथीला मंदिरांमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण मिळविताना कोणत्याही भागातील प्रशासनावर मर्यादा पडणे स्वाभाविकच असते. उपलब्ध जागेच्या क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाली, की चेंगराचेंगरी होणे स्वाभाविकच आहे. त्यातून अफवा, पुढे जाण्याची घाई, गर्दीमुळे निर्माण झालेला उकाडा, श्वास घेण्यासाठी होणारा त्रास व त्यातून पळापळ प्रसंगी एकमेकांना अक्षरश: तुडवतच गर्दी मार्गक्रमण करत असते. त्यातून मृत्यूकांड होते. काही काळ हळहळ व्यक्त केली जाते. चर्चांना उधाण येते, काही दिवसांनी पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती त्या ठिकाणी पाहावयास मिळते.ऑगस्ट २००३ मध्ये नाशिकच्या कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ यात्रेकरूंचा मृत्यू झाला होता. म्हणजे या घटना दक्षिण अथवा उत्तर भारतात घडतात, अशातला भाग नाही. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात २००५ साली मांढरदेवी येथील काळुबाई देवस्थानाच्या ठिकाणीही अशा प्रकारची चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली होती. त्या दुर्घटनेत तर जवळपास ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू तर २५० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते. दरवर्षी शाकंभरी पौर्णिमा मेळ्यानिमित्त काळुबाई मंदिरात लाखो भाविक जमतात. त्यावर्षी देवीला नारळ आणि बकरे अर्पण करण्यासाठी जवळजवळ दोन लाख लोक जमले होते, कोणीही अशा प्रकारची दुर्घटना घडावी अशी इच्छा केली नसती. मंदिरात फक्त स्टॉलने वेढलेल्या एका अरुंद गल्लीतून प्रवेश करता येतो. दुपारनंतर सुरू झालेल्या चेंगराचेंगरीमुळे,



आतील गर्भगृहात जाणाऱ्या पायऱ्यांवर साचलेले नारळपाणी आणि दिव्याचे तेल निसरडे झाले. काही महिला पाय घसरून पडल्या आणि त्या तुडवल्या गेल्या. वरच्या विजेच्या तारा तुटल्या, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीनंतर एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाल्याने चेंगराचेंगरी झाली.परवाच्या व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेचा आढावा घेतला असता, त्या घटनेतही अन्य घटनांच्या तुलनेत फारसे वेगळे काही दिसत नाही. व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेनिमित्त मंदिरात मोठ्या संख्येने भाविक जमा झाले होते. मंदिरात प्रवेश करण्याची व मंदिरातून बाहेर पडण्याची जागा अरुंद असून मंदिर परिसरात बांधकाम सुरू असल्याने ही दुर्घटना घडली. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे भाविकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली. एकादशी हा हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र दिवस आहे. याच पवित्र दिवशी व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी जमले होते. मात्र, पोलीस आणि मंदिर प्रशासनाकडून गर्दीवर नियंत्रण मिळवता आले नाही. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊन भाविकांना आपला जीव गमावला. व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेमुळे दक्षिण भारताला हादरा बसला असून अलीकडच्या काळात चेंगराचेंगरी, त्यातून घडणाऱ्या दुर्घटना आणि मृत्यूचे तांडव या घटना ठरावीक अंतरानी घडतच चालल्या आहेत.व्यंकटेश्वर मंदिरात झालेली चेंगराचेंगरीची घटना या वर्षातील आंध्र प्रदेश राज्यातील तिसरी घटना आहे. ३० एप्रिल रोजी विशाखापट्टणम येथील सिंहचलम मंदिरात पावसामुळे भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला होता. ८ जानेवारी रोजी आंध्र प्रदेशातील तिरुपती येथे तिरुमला येथील भगवान वेंकटेश्वर मंदिराच्या विशेष दर्शनासाठी तिकिटे वाटप करण्यासाठी काउंटवर झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन सहा जणांचा मृत्यू झाला होता. काही दिवसांपूर्वीच शेजारच्या तामिळनाडू राज्यात अभिनेता आणि आता राजकीय पक्षाचा नेता झालेल्या थलपती विजयच्या रॅलीत चेंगराचेंगरी होऊन ४१ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काही दिवसांनीच आता आंध्रात ही दु:खद घटना घडली आहे. इंडियन प्रीमियर लीग'चे (आयपीएल) जेतेपद पटकावल्यानंतर जून महिन्यात 'आरसीबी' संघातील खेळाडूंच्या विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनने चिन्नास्वामी क्रीडांगणात केले होते. या वेळी क्रीडांगणाबाहेर चाहत्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. यादरम्यान चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५६ जण जखमी झाले. दिल्लीतील रेल्वे स्थानकावरही चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली होती, ज्यात अनेकजण जखमी झाले होते. नवी दिल्ली येथील रेल्वेस्थानकावर १५ फेब्रुवारी २०२५च्या रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण घायाळ झाले आहेत.महाकुंभाला जाण्यासाठी हिंदू भाविकांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. त्यामुळे प्रयागराजसह बिहार, उत्तर प्रदेशातील स्थानके आणि आता नवी दिल्ली येथे फलाटांवर गर्दी ओसंडून वाहत आहे. गर्दीचे नियंत्रण करणे कोणत्याही प्रशासनाला सध्या शक्य होत नाही, असे लक्षात येते. चेंगराचेंगरीमुळे मृत्यूचे होणारे तांडव अलीकडच्या काळात ठरावीक कालावधीनंतर घडतच आहे. अशा घटनांना आळा बसणे आवश्यक आहे. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्यावर दुर्घटना होणे स्वाभाविकच आहे. अशा घटनांना आवर घालणे काळाची गरज आहे. कोणतेही प्रशासन गर्दीला नियंत्रणात आणू शकत नाही. त्यामुळे लोकांनीच गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले तरच अशा घटनांना पूर्णविराम बसेल. महाराष्ट्रातील पंढरपूरात तर आषाढीचा भाविकांचा महापूर लोटतो. विठूरायाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरात येतात. पण सर्व काही शिस्तबद्ध असते. चंद्रभागेच्या पात्रात स्नानासाठी लाखो भाविक एकाचवेळी असतात. भाविक रांगेत दर्शन घेतात. पण तिथे चेंगराचेंगरी नसते. लाखो भाविक येऊन विठूरायाच्या पंढरीत चेंगराचेंगरी होत नाही, याचे इतर ठिकाणी गर्दी करणाऱ्या भाविकांनी अनुकरण करणे आवश्यक आहे.

# स्वादाच्या शोधात हरवले 'स्वच्छ पुणे'

पुण्यातील खाऊगल्ल्या या शहराच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा एक भाग आहेत. मात्र, खाऊगल्ल्यांमुळे पुणेकरांना खूप त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवरील कचरा आणि अस्वच्छ दृश्यांमुळे पुण्याच्या स्वच्छ आणि स्मार्ट सिटी प्रतिमेला धक्का बसत आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यावर त्याचा परिणाम होताना दिसून येत आहे. त्यामुळे स्वादाच्या शोधात 'स्वच्छ पुणे' कुठेतरी हरवताना दिसत आहे.अनेक खाऊगल्ल्यांनी पुणेकरांच्या जिभेचे चोचले पुरवले आहेत. रात्री उशिराही परवडणाऱ्या दरात या खाऊ घालत आहेत. शहरात सध्या १०० हून अधिक खाऊगल्ल्या आहेत. यांचा व्यवसायही तेजीत सुरू असतो. पुणे शहरात किती खाऊगल्ल्या आहेत याचा आकडाही सांगू शकत नाही. कारण प्रत्येक मोठ्या रस्त्यावर खाऊगल्ली आहे. टिळक रस्ता, फर्ग्युसन रस्ता, सारसबाग अशा ठिकाणी खाऊगल्ल्या थाटल्या आहेत. रस्त्यांवर थाटलेल्या स्टॉलमधील उष्टे अन्न रस्त्यावर टाकणं, सांडपाणी तेथेच फेकणे, कचऱ्याचे ढीग होणे यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे. स्टॉलधारक आपल्या मालकीचा रस्ता असल्यासारखा रस्त्यावर खुर्च्या टाकून ग्राहकांची सोय करत असतात.खाऊगल्ल्यांचा वाढता पसारा पाहून रस्त्यावर चालणेही कठीण झाले आहे. यासोबतच दुचाकीचे बेकायदेशीर पार्किंग, वाहतुकीचा खोळंबा, अतिक्रमणामुळे अरुंद रस्ता या बेशिस्तीला यंत्रणांकडून होणाऱ्या दुर्लक्षामुळे पाठबळच मिळत आहे. या खाऊगल्ल्यांमध्ये अतिक्रमण, अनधिकृत विक्रेते आणि बेशिस्त वाहनचालक या तीन समस्या प्रामुख्याने भेडसावतात. खाद्यपदार्थ विक्रीच्या हातगाड्यांसमोर अनेकजण दुचाकी उभ्या करतात. त्यामुळे अधिक




वाहतूक कोंडी होते. ठिकठिकाणी चहा विक्रेत्यांच्या टपऱ्या आहेत तिथे मोठ्या प्रमाणात नागरिक चहा घेण्यासाठी रस्त्यावर थांबलेले असतात, त्यामुळे सकाळी, सायंकाळी मध्यवस्तीत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. वाहनचालक सतत हॉर्न वाजवत असतात. त्यामुळे ध्वनी प्रदूषणही मोठ्या प्रमाणात होते.रुचकर आस्वाद विविध खाऊगल्ल्यांमध्ये घेता येतो. मात्र, याच खाऊगल्ल्यांच्या परिसरातील सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांकरिता ही ओळख डोकेदुखी ठरत आहे. या परिसरात होणाऱ्या अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अस्वच्छतेमुळे डास, कीटक आणि उंदरांचा प्रादुर्भाव वाढत आहे. या असुविधा दूर झाल्या पाहिजेत. फोडणी आणि दुर्गंधीचा त्रास एवढा होतो की नागरिकांना तिथे बसणेही अशक्य होते.शहरात हॉटेल, खानावळींसह खाऊगल्ल्यांमध्ये अन्नपदार्थ विक्रेत्यांची संख्या वाढत असतानाच या विक्रेत्यांची तपासणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. परिणामी, शहरात होणाऱ्या अन्न पदार्थांची तपासणी होते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एफडीएच्या अन्न निरीक्षकामार्फत तपासणी केली जाते. मात्र, अन्न निरीक्षकांची संख्या कमी असल्याने अन्न तपासणीवर मर्यादा येत आहे. एफडीएकडून परवाना घेणे बंधनकारक असते; परंतु अनेक विक्रेत्यांकडे परवाना नसल्याचे आढळून येते. अनेक अन्न पदार्थामध्ये पनीर आणि बटरचा वापर अधिक असतो. त्यातच अधिक भेसळ आढळून येते. यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असतो. त्यामुळे याची अधिक तपासणी करणे गरजेचे आहे.फूड स्टॉलला नियोजनबद्ध परवाने देऊन त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवावी. यासाठी सुव्यवस्थित परवाना प्रणाली अमलात आणली पाहिजे. प्रत्येक स्टॉलजवळ डस्टबीन ठेवणे बंधनकारक केले पाहिजे. त्याचप्रमाणे पुणे महापालिकेनेही तिथली नियमित साफसफाई करणे, गरजेचे आहे. अशाप्रकारे स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनावर काम करणे गरजेचे आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवणे गरजेचे आहे. आरोग्यावर होणारे परिणाम पाहता आरोग्य विभागाकडून नियमित तपासणी करून स्वच्छतेचे निकष पाळले जात आहेत का, हे पहाणे गरजेचे आहे. कचरा विभाजन, पुनर्वापर याबाबत जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. प्लास्टिकऐवजी कागदी किंवा धातूचे पुन्हा वापरता येणारे साहित्य वापरावे, जेणेकरून पर्यावरणाचेही रक्षण होईल.पुणे महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रत्येकी पाच ते सहा खाऊगल्ल्या आहेत. याशिवाय बहुतांश ठिकाणी खाद्यपदार्थांचे स्टॉल आहेत. स्टॉलमुळे रस्ते आक्रसले असून, वाहतूक कोंडीतही भर पडत आहे. शहर आणखी अस्वच्छ होण्यापूर्वीच तातडीने यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. खाऊगल्ल्या या पुण्याच्या खाद्यसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहेत. पण, योग्य व्यवस्थापन आणि स्वच्छता राखली नाहीत, तर त्या शहराच्या बकालपणाचे कारण ठरतात. नागरिक, विक्रेते आणि प्रशासन या तिन्ही घटकांनी एकत्र येऊन शिस्तबद्ध आणि स्वच्छ खाऊगल्ल्या निर्माण केल्यास पुणे अधिक सुंदर आणि आरोग्यदायी बनू शकते.

# ज्येष्ठ नागरिकाचा न्यायासाठी प्रयास आणि प्रवास

जीवनात अनेकदा लहान चुका किंवा चुकीच्या नोंदीही मोठा संघर्ष निर्माण करतात. अशाच एका परिस्थितीत, ७८ वर्षीय विष्णू देव दुबे यांना त्यांच्या आरोग्य विमा दाव्यामुळे दीर्घ आणि धैर्यशील लढाई करावी लागली. बंगळूरुमधील बेलंदूर परिसरात राहणारे विष्णू देव दुबे, ७८ वर्षांचे वयोवृद्ध, आपल्या आरोग्याच्या काळजीसाठी सदैव सज्ज राहायचे. २०१४ साली, त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने निवा बुपा ( पूर्वी मॅक्स बुपा) हेल्थ इन्शुरन्सकडून ३२ लाख रुपयांची आरोग्य विमा पॉलिसी घेतली. दुसऱ्या वर्षी त्यांनी पॉलिसीचे नूतनीकरण करून २.०८ लाख रुपये भरले.

मार्च ते मे २०१६ दरम्यान, दुबे यांना मूत्रविषयक आजारामुळे अपोलो हॉस्पिटल, साक्रा हॉस्पिटल आणि मणिपाल हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले. त्यांनी १४.०२ लाख रुपयांचे दावे सर्व वैद्यकीय कागदपत्रांसह विमा कंपनीला सादर केले. पण त्यांच्या आश्चर्याचा आणि चिंतेचा क्षण आला, जेव्हा निवा बुपाने त्यांचा दावा नाकारला. कंपनीने म्हटले की दुबे यांनी पूर्व अस्तित्वातील आजाराची माहिती लपवली, कारण त्यांच्या आरोग्याच्या नोंदीत असे नमूद होते की, आजाराची लक्षणे 'दोन आणि अर्ध वर्षे' सुरू आहेत. या नोंदीवरून कंपनीने



पॉलिसी मार्च २०१६ मध्ये रद्द केली; परंतु सत्य काही वेगळेच होते. अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी नंतर स्पष्ट केले की, ही केसशीटमधील लेखन चूक आहे; प्रत्यक्षात आजाराची लक्षणे केवळ 'दोन-अडीच आठवड्या'पासून होती. मात्र, कंपनीने या सुधारित माहितीचा विचार न करता आपला निर्णय कायम ठेवला.

दुबे यांनी प्रथम विमा लोकपालाकडे तक्रार दाखल केली, पण जुलै २०१७ मध्ये ती फेटाळली गेली. न घाबरता त्यांनी पुढे जिल्हा ग्राहक मंचात तक्रार दाखल केली, ज्यात त्यांनी दावा नाकारला जाणे, पॉलिसी रद्द करणे आणि त्यातून झालेला मानसिक त्रास याबाबत न्याय मागितला.जिल्हा मंचाने त्यांचा दावा मान्य करून ४.८१ लाख रुपये देण्याचा आदेश दिला; परंतु दुबे यांना ही नुकसानभरपाई अपुरी वाटली. त्यांनी कर्नाटक राज्य ग्राहक आयोगात अपील केले. राज्य आयोगाने त्यांच्या याचिकेला मान्यता देत ९.२ लाख रुपये (६% व्याजासह) देण्याचे ठरवले, तसेच ३२ हजार रुपये लॉयल्टी कूपन लाभ आणि ५० हजार रुपये मानसिक त्रास व न्यायालयीन खर्च देखील मंजूर केले.निवा बुपा कंपनीने याच निर्णयाला एनसीडीआरसीसमोर आव्हान दिले. त्यांनी म्हटले की पॉलिसी आधीच रद्द झाली आहे आणि त्यामुळे आता त्यांची कोणतीही जबाबदारी नाही. तथापि, एनसीडीआरसीने कंपनीचे सर्व युक्तिवाद फेटाळले. आयोगाने ठरवले की निवा बुपाने अन्यायकारक आणि मनमानीपणे कारवाई केली आणि अपोलो हॉस्पिटलने दिलेले सुधारित वैद्यकीय पुरावे लक्षात न घेणे हे गंभीर त्रुटीचे उदाहरण आहे. अखेर, ३ ऑक्टोबर २०२५ रोजी एनसीडीआरसीने राज्य आयोगाचा निर्णय कायम ठेवला.

# श्री संत मन्मथस्वामी भक्त कपिलधारहून परळीच्या प्रभू वैद्यनाथाकडे

## वीरशैव लिंगायत समाज व श्री मन्मथस्वामी सेवा संघ यांच्या वतीने हजारो भाविकांना खिचडी प्रसाद वाटप

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथस्वामींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेवून आपआपल्या गावी परतणार्या वीरशैव लिंगायत बांधवांची पाऊले बुधवार दिनांक पाच नोव्हेंबर रोजी परळीतील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्री क्षेत्र वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनासाठी वळत असून परळीत यावे श्रीं चे दर्शन घ्यावे असे समिकरणच आता रूढ झाले आहे. एकीकडे भाविकांची गर्दी वाढत असतांना त्यांना आपल्याला घडेल त्या श्रद्धेतून त्यांच्यासाठी खिचडी, चहा, पाणी व अन्य अन्न पदार्थाचा महाप्रसादही परळीतील वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी, व सदस्य गेल्या १८ वर्षापासून करीत आहेत. श्री व सौ भाग्यवंत आप्पा यांच्या



हस्ते श्रींचे पूजन करण्यात आले.

श्री संत श्री संत मन्मथ स्वामी सेवा संघाचे शिवराजआप्पा बोटूळे रघुनाथ आप्पा भाग्यवंत व उज्वला भाग्यवंत यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.शिवराज आप्पा बोटुळे, रामकिशन आप्पा साखरे, सोमनाथ आप्पा ओपळे, प्रकाश धोकटे, संजय कोरे बालाजी सेलुकर, रघुनाथ आप्पा भाग्यवंत, संदीप हालगे, महादेव मोडीवाले, शिवाजी बुद्रे, राजाभाऊ खोत व सहकार्‍यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. श्रीक्षेत्र कपिलधारहुन दर्शन घेऊन परत येणार्या भाविकांसाठी बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मठ संस्थान बेलवाडीमध्ये येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाच्या वतीने खिचडी प्रसादाचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ठेवण्यात आला. श्री मन्मथ स्वामींच्या यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांची पाऊले आता आपआपल्या घराकडे वळत असतांना श्री क्षेत्र परळी येथे वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनाकडेही वळाली आहेत. आज दिवसभर भाविक मोठ्या संख्येने परळीत दाखल झाले आहेत. मागील १८ वर्षापासून ही परंपरा परळीमध्ये वीरशैव समाज व श्री मन्मथ स्वामी सेवा संघ हे जपत आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वीरशैव महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्ताप्पा इटके गुरुजी, अॅड. मनोजआप्पा संकाये, पत्रकार श्री संजय खाकरे, संतोष जुजगर, संपादक बालाजी ढगे आदी उपस्थित होते.


### बेलवाडी परिसराला आले जत्रेचे स्वरूप

**श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत मन्मथ स्वामी यांच्या पवित्र समाधी स्थळाचे दर्शन घेऊन आंध्रप्रदेश कर्नाटक, तामिळनाडू व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले हजारो भाविक भक्तांनी आज बुधवारी परळी येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले प्रभुवैद्यनाथाचे दर्शन घेतले. परळीत आलेल्या भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था वीरशैव लिंगायत समाज, श्री मन्मथ स्वामी सेवा संघ यांच्या वतीने करण्यात आली होती. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भावीक भक्तांनी गर्दी केल्याचे दिसून आले. दरम्यान बेलवाडी परिसरात बेल, फुल, नारळ आदी प्रसादालयाची दुकाने मोठ्या संख्येने घातली गेली होती त्यामुळे वैजनाथ मंदिर परिसराला जणू काही जत्रेचे स्वरूप आल्याचे दिसून आले.**

# शेतकर्‍यांचे आर्थिक जीवन भाजप सरकारने उध्वस्त केले–वसंत मुंडे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

भाजपच्या सरकारने जाहीर केलेला शेती मालाला बाजारपेठेत आधारभूत हमीभाव मिळत नसल्यामुळे केंद्र व राज्यातील सरकारचे आयात निर्यात धोरण शेतकर्‍याच्या शेतीमाला बाबत चुकीचे असल्या मुळे शेतकर्‍याचे आर्थिक जीवन उद्धुस्त केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.शेतकर्‍याकडे शेतीमाल तयार झाला की परदेशातून शेतीमाल व्यापार्‍या मार्फत आयात केला जातो, व्यापार्‍या कडून संबंधित मंत्री, अधिकारी यांनाटक्केवारी मिळते.शेतकर्‍याच्या तयार झालेला शेतीमाल बाजारपेठेत कमीदरामध्ये खरेदी विक्री व्यवहार करून आर्थिक दृष्ट्या शेतकर्‍याचे जीवन संपवणे हे मोठे भाजपच्या सरकारचे धोरण आहे.केंद्र व राज्य सरकारचे बाजार पेठेवर नियंत्रण नाही. दैनंदिन संपूर्ण अहवाल कृषी खाते अधिकारी मंत्री तपासत नाहीत व संबंधित खरेदी–विक्री करणारे व्यापारी बाजारपेठवर पणन विभाग मार्फत शासनाकडून नियमानुसार कारवाई केली जात नाही भाजप सरकारचे खते,बी बियाणे,कीटकनाशके, औषधी,शेती अवजारे विविध कर लावून शेतकर्‍याचे जीवन संपवण्याचे मोठे कट कारस्थान आहे. शेतकर्‍यांनी देशांमध्ये वेगवेगळे जन आंदोलन न्याय हक्कासाठी उभे केले परंतु ते चिरडण्या साठी शासकीय यंत्रणेचा दूर वापर करून ७०० पेक्षा जास्त शेतकरी मृत्युमुखी पडले अश्रु धुराचा वापर करून नळकांडे फोडले. शेतकर्‍यावर लाठीचार्ज करून मारहाण केली, पाईपद्वारे पाण्याचा शेतकर्‍यावर तुफान मारा केला,इंटरनेट सेवा बंद केली,रोडवर बॅरिकेट्स लावून खड्डे खोदून सिमेंट रोडवर खडी मोठे मोठे दगड लोखंडाच्या जाळ्या टाकून खिळे ठोकून



रोड ब्लॉक केले.शेतकर्‍यांना दिल्लीमध्ये आंदोलना साठी न येऊ देण्याचे मोठे कटकारस्थान सरकारने रचून शेतकर्‍याचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. तरी ही शेतकरी न्याय हक्कासाठी लढत राहिला परंतु भाजपच्या सरकारने शेतकर्‍यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. भाजपाचे सरकार शेतकर्‍यांसाठीकर्दनकाळ असून शेतकर्‍याचे जीवन संपण्याचे मोठे कट कारस्थान रचले जात आहे.आंदोलन चिरडण्या साठी सर्वस्तराचा शासकीय यंत्रणेचा वापर करून शेतकर्‍यांच्या सायकल,मोटरसायकल, बैलगाडी,ट्रॅक्टर,टेम्पो, जेसीबी इत्यादी वाहनांना जंतर–मंतर मैदानावर न येऊ देण्यासाठी सर्व स्तरा वर षडयंत्र रचून शेतकर्‍याचे जीवन संपण्याचे मोठे कट कारस्थान रचले.पिक विमा व विविध शासनाचे अनुदाने शेतकर्‍याला वेळेवर दिले जात नाहीत बोगस बी बियाणे निघाल्यास शेतकर्‍याला नुकसान भरपाई देण्याची कायद्यात तरतूद नाही सरकारने जाहीर केलेला किमान आधारभूत हमी भाव दिला जात नाही . शेतीमधील दैनंदिन खर्च लाईट बिल,नैसर्गिकसंकटे जीएसटी कर मजुरी मध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे भाजपच्या सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या कमकुवत झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

# गटई कामगाराच्या दुकानाला लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक!राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने दिला मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप साहेब राष्ट्रीय अध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सल्लागार पंढरीनाथ पवार, प्रदेशाध्यक्ष डॉ शांताराम कारंडे यांच्या अध्यक्षतेखाली चर्मकार समाजातील शांताराम गायकवाड यांच्या डि मार्ट शेजारील मुंबै बँकेच्या समोर ठाकुर व्हिलेज कांदिवली पूर्व मुंबई येथील गटई कामगार दुकानाला दिवाळीच्या दिवशी आग लागली होती त्या मध्ये गटई कामाचे साहित्य जळुन खाक झाले होते चर्मकार समाज बांधवांनी त्यांना नवीन सामानाची मदत करून त्यांची उपजिविका पुन्हा चालू करून दिली त्या वेळी प्रमुख उपस्थिती मुंबई कार्याध्यक्ष दादाभाऊ माने मुंबईअध्यक्ष बाळू आहीरे रिपाइंचे कांदिवली तालुकाध्यक्ष मधुकर गवई, संतोष शिंदे जिल्हाध्यक्ष बाबू गोरे रामेश्वर वाडेकर एकनाथ वाडेकर प्रकाश जाधव उनवणे,गटई अध्यक्ष सूर्यकांत कांबळे, अंकुश पटेकर व सर्व समाज बांधव उपस्थित होते.





आधुनिकतेच्या वाटेवर चालत असताना चर्मकार समाजाचे चप्पल बूट दूरूस्तीची दुकाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत आता पूर्वीसारखा धंदा होत नाही रिपेअरची कामे फारच कमी होतात त्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे त्यात दुकान जळुन साहित्य खाक होणे यापेक्षा दुःखद काय असु शकते असे भारी अंतःकरणाने गटई कामगार शांताराम गायकवाड आपले विवंचना सांगत होते सरकार मायबाप यांनी आमच्याकडे सुद्धा लक्ष वेधून आमचे ही दुःख दुर करावे ही अपेक्षा व्यक्त केली

# बीड जिल्ह्यात अनुसूचित जाती/जमातीच्या हक्कांसाठी ठोस निर्णय–नितीन सोनवणे

## राज्य आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य मा. गोरक्ष लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ऑल इंडिया पँथर सेनेच्या प्रतिनिधींसमवेत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जाती/जमातीच्या हक्कांसाठी अनेक ठोस निर्णय घेण्यात आले. जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन आणि समाज कल्याण अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पीडितांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाईचे निर्देश देण्यात आले.बैठकीत प्रामुख्याने महात्मा फुले अंतर्गत छडऋऊ निधीच्या मागणीवर चर्चा झाली. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बजेट मंजुरीसाठी जोरदार मागणी करण्यात आली. यावर मा. आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी तात्काळ चौकशी करून सामाजिक न्याय विभाग, बीड यांना निधी मंजुरीचे लिखित निर्देश दिले. लवकरच बीड जिल्ह्यातील सर्व तक्रारदारांना हा निधी





मिळणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.डउ/डढ (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ अंतर्गत पुनर्वसन निधीच्या वितरणाबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अत्याचार पीडितांना तात्काळ पुनर्वसन निधी मंजूर आणि वितरित करण्याची मागणी मान्य करून आयोगाने याबाबत लिखित निर्देश जारी केले.

बीड जिल्ह्यातील 'इ ऋळपरश्र' प्रकरणांमध्ये पोलीसांनी तक्रारदारांना मदत नाकारल्याबाबतच्या तक्रारीवरही चर्चा झाली. यासंदर्भात ऑल इंडिया पँथर सेनेने लिखित निवेदन सादर केले. तसेच, आष्टी पोलीस स्टेशन (कडा चौकी) येथील प्रकरणात अविनाश सोनवणे यांना संशयित म्हणून पोलीसांनी मारहाण केल्याच्या घटनेचा समावेश होता. दोषी पोलीस कर्मचार्‍यांना बडतर्फ करण्याची मागणी करून सर्व पुराव्यासह लिखित निवेदन मा. आयोग सदस्य आणि जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रतिनिधी म्हणाले, अनुसूचित जाती/ जमातीच्या न्याय आणि हक्कांसाठी आम्ही सातत्याने लढत राहू. हक्क मिळवून देण्याचा निर्धार आहे. बैठकीला ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष,नितीन सोनवणे, सुंदर वाघमारे,सुर्यकांत ठोकळ,नितीन लोखंडे,मधुकर लोखंडे व कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# पिशोर येथे बाळ्या सायकल म्बुलन्सवाला या मराठी ग्रामीण कादंबरीचे प्रकाशन संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**पिशोर । प्रतिनिधी**

पिशोर येथे चला जाऊया, कवितेच्या गावा... आयोजित केलेल्या तिफण स्नेह मेळावा आयोजक ड.कृष्णा काका पाटील जाधव कादंबरीवर भाष्य नाना लहाने यांनी कादंबरीला पूर्ण न्याय देत आपली जबाबदारी पार पाडली. या आधी १५ नोव्हेंबर २०२३ ला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदानातून बहुरंगी काव्यसंग्रह प्रकाशित. शून्यातून विश्व निर्माण करणार्‍या अयशस्वी माणसाची यशस्वी कहाणी... फळाची अपेक्षा न करता कर्म करणार्‍या ध्येयवेढ्या माणसाची ही कहाणी... स्वतःच्या आयुष्याचा मार्ग स्वतः बनवणार्‍या संघर्षकाराची ही कहाणी... या कादंबरीत ग्रामीण भागाच्या वेदना, ग्रामीण भागात राहणार्‍या माणसांच्या जीवनाचा खडतर प्रवास मांडलेल्या आहे... ही कादंबरी पिशोर व पिशोरपरिसरावर आधारित आहे . याच ग्रामीण कादंबरीचे पिशोर येथे बाळ्या सायकल म्बुलन्सवाला या मराठी ग्रामीण कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी उपस्थित त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड, अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड चे तिफणकार डॉ. प्रा. शिवाजी हुसे, नायब तहसीलदार दिलीप कुमार सोनवणे, डॉ.प्रा.संजय गायकवाड,युवा नेते गणेश घुगे,रंगनाथ लहाने आदीच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन झाले. प्रवीण दाभाडे , ज्ञानेश्वर गायके, संदीप वाकडे, श्रीराम दापके, अनिल भडगे, डॉ. प्रा. केशरचंद राठोड ,संदीप ढाकणे, दत्ता मोरस्कर,भगवान लहाने , प्रकाश शहरवाले,अरुण थोरात, जगन्नाथ जाधव, अशोक दुधकर , सुरेश औटे, निवृत्ती काळे, आदींनी पुढील साहित्यिक वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.

# सुरेशराव आपण आमदार असल्यासारखे बोलावे,वागावे,आम्हांला फुगेवाले समजु नका

## आम्ही मतदार संघातीलच आहोत–माजी आ.भीमराव धोंडे यांचे आ.धस यांना प्रत्युत्तर

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

सुरेशराव धस साहेब अहो तुम्हांला बीड जि.प.चे उपाध्यक्षपद कुणामुळे मिळाले ? विधानसभा निवडणुकीत आम्ही तुमच्या जिंदाबादच्या (वय विसरुन) घोषणा दिल्या होत्या. त्यावेळी तुम्ही निवडून आलात, राज्यमंत्री झालात.हे सोयीस्कर विसरु नका.उपकाराची परतफेड अपकारने करण्याची तुमची सवय आहे.महेश (कडा) सहकारी सखर कारखान्याचे लायसन्स दि.८ एप्रिल २०२४ म्हणजे सोळा महिन्यापुर्वी रद्द झालेले आहे. आमदार महोदय त्यावेळेस आमचे संचालक मंडळ नव्हते.ते संचालक मंडळ तुम्हीच जाईंट डायरेक्टरला सांगुन रद्द केले होते.आम्ही शासनाकडे अपील केले होते.दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी आमचे संचालक मंडळ पुर्नस्थापीत झाले.महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने १० ते २० वर्षापासून बंद आहेत त्यांचे लायसन्स रद्द झालेले नाहीत.आमच्या सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स कुणी व कसे रद्द केले हे ऊसउत्पादक शेतकरी,मतदार संघातील जनतेला माहित आहे.यशवंत (थेऊर),शंकर (यवतमाळ), शिवशक्ती,सुधाकर नाईक सहकारी साखर अशी अनेक कारखान्याचे उदा. आहेत.सुरेशराव आपण आमदार असल्यासारखे बोलावे,वागावे, आम्हांला फुगेवाले समजु नका,आम्ही मतदार संघातीलच आहोत असे माजी आ.भीमराव धोंडे यांनी आ.धस यांना आज पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले.महेश (कडा) सहकारी सखर कारखान्याचे लायसन्स प्रकरणात सध्या आजी –माजी आमदारात कलगीतुरा रंगला आहे.माजी आ.धोंडे पुढे म्हणाले की,आ.सुरेश धस यांना आपण २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मदत केल्यामुळे ते मंत्रिमंडळात दिसले. हे त्यांनी विसरु नये. मी त्यांना ब–याचवेळा राजकीय मदत केलेली आहे.त्यांनी मला एकदाही मदत केली नाही.ऊलट माझ्या विरोधातील उमेदवारला मते देऊन माझा पराभव केला आहे. आमदारांनी आमदारासारखे वागावे.या आ.धस यांना उपकाराची परतफेड अपकाराने करण्याची सवय असल्याचा आरोप माजी आ.भीमराव धोंडे यांनी आ.सुरेश धस यांच्यावर केला आहे.

आष्टीचे आ.सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेऊन माजी आ.भीमराव धोंडे यांच्यावर केलेल्या आरोपाला उत्तर देण्यासाठी आष्टी येथील आनंद भवन येथे आज रविवार दि.२ नोव्हेंबर रोजी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माजी भीमराव धोंडे बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले,आमच्या कारखान्याचे लायसन्स हे दि.८ एप्रिल २०२४ रोजी परंतु पुन्हा संचालक मंडळ २५ फेब्रुवारी २०२५ स्थापन झाले



आहे.महाराष्ट्रामध्ये १० ते २० वर्षांपासून बंद असूनही त्यांचे परवाना रद्द झाले नाहीत.जे नियमानुसार कामगारांचे देणे आहे ते देण्यास आमचे संचालक मंडळ बांधील आहे.उलट आमदार महोदयांनी २००७ ते २००८ हे दोन वर्ष कारखाना चालविला त्यांचे कामगारांचा पीएफ फंड दिला नाही,विशेष म्हणजे आ.धस यांनी सुपरटेक कंपनीचे थकविलेले ३ कोटी २८ लाख रुपये भाडे आमच्या संचालक मंडळाने भरले आहेत.आ.धस यांनी आम्ही हे करू ते करु अशा धमक्या देऊ नयेत. आम्हीही मतदार संघातीलच आहोत.असे बोलणे आमदारांना शोभत नाही.त्यामुळे आमदारांनी आमदारासारखे वागावे असाही सल्ला ही धोंडे यांनी दिला.महेश सहकारी साखर कारखाना विक्रीला निघाला होता.शेतकर्‍यांचा कारखाना होता. म्हणून आपण तो घेतला नाही.जुन्या नेत्यांनी खुप कष्टाने हा सहकारी साखर कारखाना उभा केला होता.ज्यांनी कारखाना सुरु केला ते आता हयात नाहीत.आपण निवडणुकीत तो कारखाना जिंकला ऊस क्षेत्र वाढले आहे.इतर पिके परवडत नाहीत.त्यामुळे परवाना मिळविण्यासाठी खुप प्रयत्न केले आहेत.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतरांना भेटलो आहे.खाजगी कारखान्यासाठी हा सहकारी साखर कारखाना बंद पाडू नका.महेशचे लायसन्स तर मिळणारच आहे. सरकार सहकारी तत्वावरचा कारखाना मोडीत काढणार नाही.१५ दिवसात महेशला लायसन्स मिळाले नाही तर आम्ही पुणे येथील साखर आयुक्तांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करणार आहोत. मला दोन चार पक्षात गेलो फिरलो म्हणता...तुमचा राजकीय प्रवासही जनतेला माहितच आहे.राजकीय कार्यकर्ता आपआपल्या सोयीने राजकारण करतो.पक्ष निवडतो.. तुम्ही राष्ट्रवादीतुन भाजपात,भाजपा मधुन राष्ट्रवादीत गेलेले आहात..हे जनता अजुन विसरली नाही.मी लोकशाही पध्दतीने वागणारा कार्यकर्ता आहे.धाकदडपशाही करुन राजकारण करणारा नाही. आमदारसाहेब आम्हांला कारखान्याबाबत त्रास देण्यापेक्षा तुम्ही कराराने महेश कारखाना चालवयला घ्या..आम्ही कराराने हा साखर कारखाना तुम्हांला चालवण्यास देण्यास तयार आहोत.महेश साखर कारखान्याचे कामगारांच्या पगाराबाबत बोलताना धोंडे म्हणाले की,आमच्या बलेन्ससीटप्रमणे २ कोटी ३४ लाख रु.कामगारांचे पगार देणे बाकी आहे. कारखाना सुरु झाला तर टप्प्याटप्प्याने पगार दिले जातील. कारखान्याच्या जमीनीवर कामगारांच बोजा टाकल्याची पध्दती चुकीची आहे.ती नोंद रद्द करण्याचे काम कारखान्याचे संचालक मंडळ करणार आहे असेही माजी आ.धोंडे यांनी शेवटी सांगीतले.कन्सर हास्पीटलच्या उभारणीबाबत बोलताना धोंडे म्हणाले की,या हास्पीटलच्या उभारणीसाठी संस्थेतील काही कर्मचार्‍यांनी चांगल्या व मदतीच्या भावनेतुन आर्थिक मदत केली असेल तर ते तुम्हांला खुपण्याची गरज नाही.ऊलट तुम्ही या मतदार संघाचे लोकप्रतिनिधी आहात तुम्ही पुढे होऊन तुमच्या इमदर फंडातुन ५० लाख रु मदत द्यावी.मी आमदार असताना तुम्ही राज्यस्तरीय सामने भरविले होते त्या कामास मी आमदार फंडातुन निधी दिलेला आहे. सामाजिक काम व गोरगरीब कन्सर पीडीतांची सोय होणार आहे म्हणून आ.धससाहेब आपण शासनाच्या विविधा योजनातुन २५ कोटी रु चा निधी या हास्पीटलसाठी मिळवुन द्यावा.मी आपले अभिनंदन करीन.. आभार मानण्यास तयार आहे. असे माजी आ.धोंडे म्हणाले.

# चार जणांनी बौध्द मुलाला बेदम मारहाण करून जिवे मारण्याची दिली धमकी!

## मारहाण करणाऱ्या चौघांविरुद्ध केज पोलिसांत अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल

## एकुरका गावातील घटना ; बौध्द कुटुंब झाले भयभीत!

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

आमच्या मुलीला मोबाईल वरून मेसेज का केलास या आरोपावरून एकुरका गावातील एका बौध्द मुलाला गावातील चौघांनी घरातुन उचलुन रानात नेहुन जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने हे बौध्द कुटुंब भयभीत झाले असुन मारहाण करणाऱ्यांवर केज पोलिसांत अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत अधिक माहिती अशी की केज तालुक्यातील एकुरका गावातील उमेश अशोक कोकाटे वय १७ वर्षे या बौध्द मुलाला गावातील चार जणांनी जबरदस्तीने उचलीत नेहुन जबर मारहाण केली आहे. तर उमेश यास त्याच्या राहात्या घरी बसलेले असताना दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे मोटारसायकलवरून घरी आले व उमेश यास म्हटले की आपल्याला पेंडीचे पोते आणायचे आहे. तु चल असे म्हटले असता उमेश याने त्यांचे सोबत जाण्यास नकार दिल्याने मोटारसायकलवरून आलेल्या सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे यांनी त्याला ओढुन गाडीवर बसवून नेमण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात उमेशची आई तिथे आली तुम्ही असे का करता म्हणुन त्या दोघांच्या तावडीतुन आपल्या मुलाला सोडण्याचा प्रयत्न करत असताना सचिन मोरे आणि गणेश मोरे या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिल्याने ती खाली पडली तसेच या झटापटीत उमेची आई हिचे झंपर फाटले उमेश ची आई खाली पडल्याचे पाहून सचिन मोरे व गणेश मोरे या दोघांनी उमेश यास सांगितले की तुझे पप्पा आमच्या शेतात आहेत.तिथे एक काम आहे.तु आमच्या सोबत चल असे म्हणून त्याला मोटारसायकल वर टाकून शेतात नेहले. सदरील मोटारसायकल सचिन मोरे चालवत होता.तर गणेश मोरे मागे बसुन उमेश यास दोघांच्या मध्ये घेऊन शेतात नेहले. गाडी थांबताच गाडीवरून खाली उतरत असताना सचिनने पाठिमागुन ढकलल्यामुळे उमेश हा जमिनीवर पडला.त्या दोघांनी उमेश यांस सचिन मोरे यांचे वडील अभिमान मोरे व तुळशीराम मोरे यांच्या समोर नेहले असता अभिमान मोरे यांनी उमेश यास म्हटले की तू आमच्या पोरीला मेसेज का केलास




असे म्हणून उमेश यास मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यास माफी मागायला लावुन त्याचा त्यांच्या मोबाईल मध्ये व्हिडिओ शूटिंग करून घेतली. व परत मारहाण करण्यात आली.यावेळी अभिमान मोरे याने धेडग्या,माहरड्या तुझी लायकी आहे का आमच्याशी बोलण्याची अशी जातीयवाचक शिवीगाळ केली. व तु असे पुन्हा केलेल्यास तुला ठार मारुत अशी धमकी दिली. त्यानंतर तुळसीराम मोरे सचिन यांच्या हातातील लोखंडी रॉड घेऊन उमेश याच्या पाठित जबर मारहाण केली.त्यामुळे उमेश खाली जमीनीवर पडला त्यानंतरही न थांबता तुळशीराम मोरे याने उमेश याच्या पोटात लाथा बुक्या आणि चपलाने जबर मारहाण केली. वरील सर्वांनी मिळून उमेश यास लाथा बुक्याने आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण केल्याने उमेश हा काही काळ बेशुद्ध पडला. यावेळी उमेश यास काही कळत नव्हते. काही वेळानंतर उमेश यांचे वडील अशोक ऊध्दव कोकाटे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. उमेश यास सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे या चौघांनी उमेश अशोक कोकाटे यास लोखंडी रॉड,चापटाबुक्या, बुटासह चपलाने जबर मारहाण करून जातीवाचक शीवीगाळ करत उमेश यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी केज पोलिसांत उमेश अशोक कोकाटे यांस जबर मारहाण करणाऱ्या सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे यांचे विरुद्ध केज पोलिसांत ट्रॉसिटी क्ट नुसार भा.न्या.सं.(बी एन एस ) २०२३ कलम ११५ (२), ११८(१), ३५२, ३५१(१) व अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ ३(२)(ी), ३(१)(ी) व ३(२)(ीर) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस अधीक्षक यांचे मार्गदर्शन खाली केज पोलिस करत आहेत. मात्र या घटनेमुळे एकुरका गावातील कोकाटे कुटुंब भयभीत झाले असुन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.

# सारंगखेडा पोलिस ठाण्यात अधिकारी बदल एपीआय रवींद्र बागुल यांचा पदभार स्वीकार

## तर रमेश वावरे यांचा शहादा येथे बदलीनंतर गौरव



**दैनिक वादळ वार्ता**
**लाला चव्हाण । वडाळी**

सारंगखेडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश वावरे यांची बदली शहादा येथे करण्यात आली असून, त्यांच्या जागी सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र बागुल यांनी बुधवारी नवीन पदभार स्वीकारला. यानिमित्ताने पोलिस ठाण्यात त्यांचा सत्कार व निरोप सोहळा उत्साहात पार पडला.सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश वावरे यांनी सारंगखेडा येथे कार्यरत असताना उत्कृष्ट कामगिरी बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे राखली गेली. त्यांच्या कार्यकाळातील योगदानाची आठवण कायम राहील, असे मत वडाळी येथील पोलिस पाटील व पोलिस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष राजेंद्र गिरी गोसावी यांनी व्यक्त केले.या सोहळ्यात वडाळी गावाचे पोलिस पाटील राजेंद्र गिरी गोसावी यांनी निरीक्षक वावरे यांचा सन्मान केला. सारंगखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांचे पोलिस पाटील या प्रसंगी उपस्थित होते.

नवीन पदभार स्वीकारणारे सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र बागुल यांनी आपल्या भाषणात सारंगखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम ठेवण्याचे आश्वासन दिले. बागुल हे नंदुरबार शहर पोलिस ठाण्यातून येथे रुजू झाले आहेत.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी दोन्ही अधिकाऱ्यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# सहस्त्रकुंड जलविध्युत प्रकल्प रद्द करण्याची संघर्ष समीतीची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

विदर्भ-मराठवाड्याच्या सीमेवर वाहणार्या पैनगंगा नदीवर शासनाने मंजुर केलेला सहस्त्रकुंड जलविध्युत प्रकल्प रद्द करावा ह्या मागणीचे निवेदन मराठवाडा- विदर्भ संघर्ष समीतीने तहसिलदार पल्लवी टेमकर यांना दिला.

सहस्त्रकुंड जलविध्युत प्रकल्प हा हिमायतनगर तालुक्यातील कौठा तांडा येथे पैनगंगा नदीवर बांधण्यात येणार असुन ह्या प्रकल्पामुळे मराठवाडा विदर्भातील जवळपास तिस चाळीस गावाच्या शेतकऱ्याच्या सुपीक जमीनी जाणार असल्यामुळे तेथील ग्राम पंचायतीने ग्राम सभेमध्ये शासनाने हा प्रकल्प रद्द करण्याचा ठराव घेतला असुन त्याची प्रत निवेदनासोबत तहसिलदार पल्लवी टेमकर यांना दिला.प्रकल्प रद्द न झाल्यास तिव्र आंदोलन छेडण्याची भुमीका संघर्ष समीतीने घेतली आहे.




यावेळी संघर्ष समीतीचे पदाधिकारी व शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# आ.अभिमन्यु पवार यांच्या उपस्थितीत समाधान कांबळे यांचा भाजप मध्ये प्रवेश



**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

बेलकुंड येथील सामाजिक कार्यकर्ते काँग्रेस पक्षाचे युवक काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष तसेच बेलकुंड ग्रामपंचायत सदस्य समाधान कांबळे यांनी शेकडो कार्यकर्ते व मित्र परिवारासह मा.आ.अभिमन्यु पवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहिर प्रवेश केला यावेळी माजी सरपंच कोंडाबाई कांबळे, रसुल पठाण, दत्तात्रय पवार,शकील शेख, सह भाजप पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.समाधान कांबळे यांच्या पक्ष प्रवेशाने येनार्या स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडनूकीत आशिव गटात पक्षाची ताकद वाढली असून समाधान कांबळे यांच्या सोबत पितांबर पांढरे, चंद्रकांत मुकडे व असंख्य कार्यकर्ते व मित्र परिवारानी मा.आमदार अभिमन्यु पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १नोव्हेंबर २०२५ रोजी पक्ष प्रवेश सोहळा पार पडला...

# हृदयद्रावक घटनेनंतर युवकांचा ऐतिहासिक संकल्प : केजमध्ये डीजे संस्कृतीला 'बाय-बाय'!

## आकाश लांडगेच्या निधनानंतर समाज भावनेने घेतला निर्णय

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

डीजे/डॉल्बीच्या कर्कश आवाजामुळे हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन आकाश संतोष लांडगे या २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच बीड जिल्ह्यात घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असताना,केज शहरातील युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाण दाखवत एक महत्त्वपूर्ण आणि आदर्श संकल्प केला आहे.

समर्थ नगर भागातील आकाश लांडगे यांच्या श्रद्धांजली सभेत भावूक झालेल्या युवकांनी पुढील काळात केज शहरात कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात डीजे/डॉल्बी न लावण्याचा सामूहिक निर्धार व्यक्त केला. ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्यावर



होणाऱ्या गंभीर परिणामांचा विचार करून घेतलेला हा निर्णय अत्यंत कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**मान्यवरांनी केला संकल्पाचा गौरव**

या श्रद्धांजली कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड, ह.भ.प.बाळासाहेब गेंधले महाराज,माजी नगरसेवक शिवाजी आप्पा हजारे, हनुमंत भोसले सर,भाई मोहन गुंड,रणजित खोडसे,अशोक सोनवणे, विजय आरकडे,लक्ष्मण जाधव,धनंजय घोळवे, संजय कोरडे,विजय वनवे,विजय आंडिल, सुलेमान काजी,कवी गायकवाड,शिवाजी घुले साहेब,पंकज तेलंग, राजेभाऊ कुचेकर,अभी लोखंडे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून आकाश ला श्रद्धांजली वाहिली. युवकांनी घेतलेल्या 'डीजेबंदी' संकल्पाला सर्व मान्यवरांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आणि या निर्णयाचे भरभरून कौतुक केले.

**सामाजिक संदेशाचा नवा ध्वनी**

एका निष्पाप तरुणाच्या निधनाने समाजासमोर ध्वनीप्रदूषण आणि हृदयविकाराचा गंभीर मुद्दा अधोरेखित झाला आहे.केजच्या युवकांनी घेतलेला हा निर्णय इतर शहरांसाठीही एक प्रेरणादायी आदर्श ठरू शकतो. उत्सव साजरा करूया पण दुसऱ्यांच्या जीवाशी खेळून नव्हे!असा संदेश या संकल्पामधून स्पष्टपणे उमटला आहे.

# आनंदगाव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालयात दिवाळी अंक व नियतकालिके प्रदर्शनासह विविध सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड च्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी गुरु नानक यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली.दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली.दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान आयोजित दिवाळी अंक व नियतकालिके प्रदर्शनाचा समारोप दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आला.समारोप कार्यक्रमाला माजीसरपंच रामराजे गायकवाड, अरुण गायकवाड, नारायण गायकवाड, संजय सोनवणे,एस.के. वैरागे,दादासाहेब गायकवाड,रविंद्र गायकवाड,ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांच्यासह वाचकांनी सहभाग घेतला.दिनांक ३१ऑक्टोबर २०२५ रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली.दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी जलाराम जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली.सर्व कार्यक्रम व उपक्रम हे ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.सर्वच कार्यक्रमात वाचकांचा सक्रीय सहभाग होता.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077